चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०६ जुलै, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# सावली पोलीसांची दारू तस्करांविरूध्द कार्यवाही
# १२ लक्ष ९० हजाराचा मुद्दे्माल हस्तगत

दिनांक ०४/०७/२०१९ रोजी सावली येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम एका चारचाकी स्कॉर्पिओ वाहनाने सावली, जि. चंद्रपुर कडे दारूची तस्करी करणार आहे. अशा माहितीवरून सावली पोलीस पथकाने मेन रोडवर नाकेबंदी लावुन वाहनाची तपासणी केली असता, मिळालेल्या माहितीप्रमाणे एक स्कॉर्पिओ वाहन येतांना दिसले. सदर वाहनास थांबविण्याच्या प्रयत्न केला असता, वाहन न थांबता भरधाव वेगाने निघुन गेले. पोलीस पथकाने वाहनाचा पाठलाग करून काही अंतरावरच वाहनास ताब्यात घेउन सदर वाहनाची संशयावरून झडती घेतली असता वाहनामध्ये अवैधरित्या दारूचा माल मिळुन आला. वाहनात ४९ पेटया देशी दारू किं. ४,९०,०००/—रू, एक चारचाकी महिंद्रा स्कॉर्पिओ वाहन क्र. एम.एच ३१ डीके २९५५ किं. ८,००,०००/—रू, **असा एकुण १२,९०,०००/—रू** चा मुद्दे्माल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन सावली येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास सावली पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात सावली पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. श्री. खाडे, यांचे नेतृत्वात सावली येथील पोलीस पथकाने पार पाडली.

———————————————————————————————————————